Estd : 1962
'A''' Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

६३ वा वार्षिक दीक्षांत समारंभ

विद्यार्थ्यांसाठी निवेदन

- विद्यापीठाचा ६३ वा दीक्षांत समारंभ साधारणपणे नोव्हेंबर/डिसेंबर २०२६ दरम्यान नियोजित आहे.
- ऑक्टोबर २०२५ व मार्च २०२६ सत्रातील आणि यापूर्वीच्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी/पदविका, प्रमाणपत्र मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन पध्दतीने खाली दर्शविलेल्या मुदतीमध्ये दीक्षांत अर्ज करणे आवश्यक आहे.

अ. क्र.	कालावधी	प्रत्यक्ष उपस्थित (In Presence) विहीत शुल्क	पोस्टाव्दारे (ByPost) विहीत शुल्क
१)	दि. ०१ जुलै २०२६ ते दि. ३१ जुलै २०२६ पर्यत	रु. ५००/-	रु.६००/-
२)	दि. ०१ ऑगस्ट २०२६ ते दि. १५ ऑगस्ट २०२६ पर्यत	रु. ७००/-	रु. ८००/-
३)	दि. १६ ऑगस्ट २०२६ ते दि. ३१ ऑगस्ट २०२६ पर्यत	रु. १७००/-	रु. १८००/-
दीक्षांत अर्ज मुदतीनंतर, पीएच.डी प्राप्त विद्यार्थ्याचे ऑनलाईन पध्दतीने अर्ज, दि. १० सप्टेंबर २०२६ पर्यत स्वीकारले जातील. (अंतिम शुल्क रु.१७००/- किंवा रु. १८००/- नुसार)			

- पदवी प्रमाणपत्र मागणीचा अर्ज www.unishivaji.ac.in/Web Apps (Regular Convocation) या संकेत स्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने भरावा लागेल. ऑनलाईन अर्ज भरताना प्रथम संकेतस्थळावरील सर्व सूचना वाचाव्यात व आवश्यक ती माहिती सोबत ठेवावी.
- सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत व शुल्क पावती स्वत:च्या माहितीसाठी जपून ठेवावी. विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रिंट विद्यापीठात जमा करण्याची आवश्यकता नाही.
- ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरला आहे व शुल्काबाबतची कार्यवाही केली आहे. परंतु विद्यापीठाची पावती तयार झालेली नाही अशा विद्यार्थ्यांनी ३१ ऑगस्ट२०२६ पुर्वी विद्यापीठाच्या आय टी सेल विभागाशी (०२३१-२६०९३३५) संपर्क साधावा. अन्यथा आपला अर्ज संगणक प्रणाली मध्ये समाविष्ट होणार नाही याची नोंद घ्यावी.
- ऑनलाईन अर्ज करताना अर्जावरील माहिती बरोबर आहे की नाही याची खातरजमा करावी. जर विद्यार्थ्याच्या इंग्रजीमधील नावात किंवा अन्य काही दुरुस्ती असल्यास प्रथम संबंधीत स्वायत्त महाविद्यालय अथवा संबंधीत परीक्षा विभाग यांचेशी संपर्क साधावा व आवश्यक ती दुरुस्ती करुन माहिती अपडेट करुनच पदवी प्रमाणपत्राकरीता संबंधित ऑप्शनमधून अर्ज भरावा. तसेच विद्यार्थ्याने मराठी मधील आपले पुर्ण नाव व आईचे नाव बिनचूक नमुद करावे.
- विद्यापीठ अधिकार मंडळाचे ठरावानुसार 'तीन वर्षीय विधी' व 'पाच वर्षीय विधी' अभ्यासक्रमातील फक्त अंतिम वर्षाचे पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. त्यानुसार विद्यार्थ्यांनी फक्त अंतिम वर्षासाठी ऑनलाईन अर्ज भरावा.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार, सन २०२१-२०२२ पासून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना ABC ID काढून विद्यापीठ संगणक प्रणालीमध्ये त्याची नोंद करणे आवश्यक आहे. सबब ज्या विद्यार्थ्यांनी ABC ID ची नोंद केलेली नाही, त्यांनी ABC ID create करुन त्याची संगणक प्रणालीमध्ये नोंद करुन नंतरच पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज भरावा.
- M.Phil/Ph.D उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये Viva-Voce Date बिनचूक नमूद करावी, निकाल जाहीर झालेल्या पत्राची तारीख नमुद करु नये. ऑनलाईन अर्जासोबत Ph.D Declaration letter अपलोड करावे.
- २००२ पूर्वी उत्तीर्ण झालेल्या ज्या विद्यार्थ्यांचा फॉर्म रेग्युलर ऑप्शनमधून भरला जात नाही, त्या विद्यार्थ्यांनी फॉर्म भरण्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रासहीत प्रत्यक्ष दीक्षांत विभागामध्ये संपर्क साधावा. (अंतीम वर्षाचे मार्कलिस्टची झेरॉक्स, स्वत:चा आयकार्ड साईज फोटोच्या दोन प्रती व फोटोशी साम्य असलेले स्वत:चे आयडेंटीटी प्रुफ झेरॉक्स, आईचे नावासंदर्भात आवश्यक कागदपत्रे उदा. आईचे आधारकार्ड, वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी Internship completion Certificate of University प्रत आणणे आवश्यक आहे.) तसेच ज्या विद्यार्थ्यांना विद्यापीठात येणे शक्य नसेल, त्या विद्यार्थ्यांनी दीक्षांत विभागाशी संपर्क साधावा. (फोन नं.०२३१-२६०९११३/०२३१-२६०९३०२ व ईमेल : convocation@unishivaji.ac.in)
- अर्ज भरतेवेळी काही तक्रार किंवा दुरुस्ती असल्यास, विद्यार्थ्याने त्याच्या Login मधील Grievence मध्ये ती नोंदवावी.त्याचप्रमाणे मार्कलिस्टमधील दुरुस्ती असल्यास प्रथम संबंधीत परीक्षा विभागाशी संपर्क साधावा व दुरुस्तीनंतर पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज भरावा.
- दीक्षांत समारंभ आयोजनाची तारीख यथावकाश कळविणेत येईल. दीक्षांत समारंभापूर्वी पदवी प्रमाणपत्र पात्र विद्यार्थ्यांची यादी व इतर अनुषंगिक सूचना विद्यापीठाच्या वेबसाईटवर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.
- ६३ व्या दीक्षांत समारंभाच्या अनुषंगाने पदवी प्रमाणपत्र मागणी अर्जाबाबतचे सविस्तर निवेदन www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर ठेवण्यात आले आहे.

दीक्षांत विभाग
दि. २८/०६/२०२६

डॉ. अजितसिंह एन. जाधव
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ